अर्धसाप्ताहिक

महावीर जयंतीच्या हार्दिक शुभेच्छा...

# ब्रम्हपुरी समाचार

संपादक
अशोक भैया

RNI No. MAHMUL/2016/69789

E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com

Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25

गुरूवार, दि. १० एप्रिल २०२५ | वर्ष १० वे | अंक ३५ वा | ब्रम्हपुरी | पाने ६ | किंमत २ रूपये

## शालेय पोषण आहार योजनेचे वाजले तीन-तेरा

### दोन महिन्यांपासून योजनेतील तांदळाचा पुरवठा बंद

ब्रम्हपुरी/महेश पिलारे

केंद्र शासनाने वर्ग १ली ते ८वी पर्यंत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शालेय पोषण आहार ही योजना सुरू केली. परंतु विगत ०२ महिन्यांपासून शाळेला तांदळाचा पुरवठा बंद असल्यामुळे सदर योजनेचे तीन-तेरा वाजले की काय असा प्रश्न निर्माण झाला आहे. शाळा व्यवस्थापन सतत सक्षम अधिकाऱ्यांच्या संपर्कात असून देखील तांदळाचा पुरवठा सुरू झाला नाही. परिणामी विद्यार्थी तथा पालक यांच्यामध्ये प्रचंड असंतोष खदखदत आहे.

विद्यार्थ्यांचे निट पोषण झाले पाहिजे, गळती थांबून उपस्थिती वाढली पाहिजे, शैक्षणिक गुणवत्ता वाढली पाहिजे या उदात्त हेतूने शासनाने शालेय पोषण आहार योजना सुरू केली. या योजनेअंतर्गत वर्ग १ ली ते ८वी च्या विद्यार्थ्यांना अन्न शिजवून खावयास घालण्याचे काम शाळेतंर्गत केले जाते. परंतु दोन महिन्यांपासून कंत्राटदाराकडून तांदळाचा पुरवठा बंद केल्यामुळे तालुक्यातील १४५ जिल्हा परिषद व अनुदानित शाळेतील १५२४६ विद्यार्थी मध्यान्ह भोजनापासून



वंचित आहेत. तालुक्यातील अनेक शाळांनी गट शिक्षणाधिकारी यांच्याकडे शालेय पोषण आहारातील तांदूळ उपलब्ध होत नसल्याच्या तक्रारी दिल्या, गट शिक्षणाधिकारी यांनी याबाबत जिल्हा प्रशासनाला कळविले. परंतु, तांदळाचा पुरवठा करणारा कंत्राटदार व जिल्हा प्रशासन यांच्यात समस्या निर्माण झाल्यामुळे तांदळाचा पुरवठा कंत्राटदाराने बंद केल्याचे निर्दशनास आले. परिणामी अनेक निरागस बालकांस उपास सहन करावा लागला. शाळेत गळतीची समस्या निर्माण झाली. जिल्ह्यातील ७० ते ८० टक्के शाळांमध्ये मध्यान्ह भोजन योजना बंद पडली.

या संदर्भात गटशिक्षणाधिकारी मयुर लाडे यांचेशी संपर्क करण्यात आला व सदर परिस्थितीबद्दल विचारणा केली असता, तांदळाचा पुरवठा करण्याचे काम सुरू असल्याचे सांगितले. **परंतु शाळांशी संपर्क केला असता अजून पर्यंत तांदळाची खेप शाळांना प्राप्त झाली नसल्याची बाब पुढे आली. अजून किती दिवस वाट पहावी लागणार याबद्दल साशंकता आहे.**

> **शालेय पोषण आहारातील तांदळाचा बंद असलेला पुरवठा कंत्राटदाराकडून पूर्ववत करण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. लवकरच तालुक्यातील शाळांना तांदळाचा पुरवठा करण्यात येईल.**
>
> **- मयुर लाडे**
> **गट शिक्षणाधिकारी ब्रम्हपुरी**

## नगर परिषद ठेकेदाराची पथविक्रेत्यांकडून अवैध वसूली

ब्रम्हपुरी/का.प्र.

नगर परिषद हद्दीतील जून्या नगर परिषद इमारती जवळ भरणाऱ्या आठवडी बाजार व छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील भाजी व फळ विक्रेत्याकडूनच वसुलीचे अधिकार ठेकेदाराला दिले असतांना, पथविक्रेत्यांकडून सुद्धा बळजबरीने वसूली केली जात आहे. या संदर्भात फुटपाथ असोसिएशन संघटनेने तीव्र निषेध नोंदविला असून नगर परिषद प्रशासनाला सदर वसूली थांबविण्याविषयी निवेदन दिले आहे.

नगर परिषद प्रशासनाने जाहीर लिलावाची सूचना दि. ११/०३/२०२५ ला प्रसिध्द केली. त्यानुसार प्रारंभिक बोली ३ लाख रूपये ठेवण्यात आली. दि. १८/०३/२०२५ला वडसा येथील शरीफ अ. करीम शेख यांना वसूलीचा ठेका ४ लाखाच्या बोलीवर देण्यात आला. यामध्ये बाजार चौक येथील आठवडी बाजार व छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील गुजरी विक्रेत्याकडून वसूलीचे अधिकार देण्यात आले. मात्र ठेकेदाराने नियमांचे उल्लंघन करून नगर परिषद हद्दीतील फुटपाथ विक्रेत्यांकडून सुद्धा बळजबरीने वसूली करण्याचा गोरखधंदा सुरू केला आहे. प्रति विक्रेता २० रूपये या प्रमाणे अतिरिक्त वसूली करण्यात येत आहे. निविदेतील तरतूदीचा भंग करून नियमबाह्य वसूली करण्याचे काम सुरू आहे. वसूली न दिल्यास दुकान बंद पाडू अशी धमकी पथ विक्रेत्यांना देण्यात येत आहे. हा प्रकार खंडणी वसूल करण्याचा म्हणावा लागेल.

आज निदान पथविक्रेत्यांची संख्या १०० गृहीत धरली तरी प्रतिदिन प्रतिविक्रेता २०रूपये प्रमाणे ठेकेदाराला २०००रूपये नियमबाह्य वसूली प्राप्त होते. महिन्याकाठी किमान ६० हजार व वर्षअखेर अंदाजे ०७ लाख एवढी रक्कम ठेकेदाराच्या घशात जाणार आहे. ठेकेदारावर एवढी मेहरबानी कुणाची व कशासाठी याबद्दल खमंग चर्चा जनमानसात रंगत आहे. एवढी किमान वसूलीच्या लिलावाची प्रारंभीक बोली फक्त ३ लाख असावी, हे संयुक्तीक मुळीच वाटत नाही. यामध्ये नक्कीच गौडबंगाल आहे. ब्रम्हपुरी नगर पालिकेच्या मुख्याधिकारी आर्शिया जुही ह्या रजेवर असल्यामुळे त्यांची प्रतिक्रिया प्राप्त होऊ शकली नाही.




## ब्रम्हपुरीत श्रीराम जन्मोत्सव शोभायात्रा उत्साहात संपन्न

ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील जाणी वार्ड (रामनगर) मधील श्री गोविंद महाराज स्मृती श्रीराम मंदिरातून दरवर्षीप्रमाणे यावर्षीही श्रीरामनवमी उत्सव समितीव्दारा आयोजित श्री रामजन्म शोभायात्रा उत्साहात संपन्न झाली. सायंकाळी ७ वाजता श्रीराम, जानकी, लक्ष्मण यांच्या मूर्ती विधीवत रथारूढ झाल्यावर फटाक्यांच्या आतिषबाजीत व श्रीरामांच्या जयघोषात शोभायात्रेला प्रारंभ झाला. सुरूवातीला राजस्थानी समाजातर्फे विद्युत रोषणाईत आकर्षक रथावरील श्रीराम, जानकी, लक्ष्मण, हनुमंत वेषातील बाल कलाकारांनी साकारलेली आकर्षक झॉकी होती.

त्यानंतर चातुर्मास उत्सव समिती, विहिंप, राष्ट्रसेविका समिती, रा. स्व. संघ, चर्मकार समाज, राजस्थानी समाज, शिवजयंती उत्सव समिती यांच्यासह इतर झॉकी, गुरूमाऊली भजन मंडळ, शिव मंदिर मंडळ माहेर यांची दिंडी व मोठ्या संख्येने

(उर्वरित पान क्र. ६ वर)

## संपादकीय...

# व्यापार युध्द

व्यापार युद्धात जिंकणारे ते लढणारे नसतात, त्यांचे फायदे लढाईचा भाग नसलेल्या मूक प्रेक्षकांना मिळतात. ट्रम्प यांच्या पहिल्या कार्यकाळात चिनी उत्पादनांवरील टेरिफचा परिणाम म्हणून मलेशिया, व्हिएतनाम, थायलंडला फायदा झाला. अमेरिकेने आपल्या तीन सर्वात मोठ्या व्यापारी भागीदारांशी मेक्सिको, कॅनडा आणि चीनशी व्यापार युद्ध पुकारले आहे. ट्रम्प यांनी पहिले पाऊल उचलत मेक्सिको आणि कॅनडामधून होणाऱ्या आयातीवर २५% आणि चीनमधून होणाऱ्या आयातीवर १०% अशा दोन टप्प्यांत २०% कर लादला. चीन व कॅनडाने अमेरिकेच्या निवडक निर्यातीवर टेरिफ लादून प्रत्युत्तर दिले. त्यांनी आणखी वस्तूंवर कर लावण्याची धमकीही दिली. मेक्सिकोही तेच करत आहे. ही लढाई कोण जिंकेल ? ट्रम्प असे दाखवत आहेत की जणू ते आधीच जिंकत आहेत. पण, व्यापार युद्धात जिंकणारे ते लढणारे नसतात. त्यांचे फायदे लढाईचा भाग नसलेल्या मूक प्रेक्षकांना मिळतात. ट्रम्प यांच्या पहिल्या कार्यकाळात चिनी उत्पादनांवरील टेरिफमुळे व्यवसायिकांना त्यांचे उत्पादन सुविधा मलेशिया, व्हिएतनाम आणि थायलंडमध्ये हलवावे लागले.

ट्रम्प म्हणतात की, ते आता सुरुवात करत आहेत. अमेरिकेच्या करवाढीचा सामना करणाऱ्या देशांची यादी मोठी आहे. ट्रम्प यांनी ०२ एप्रिलला म्हटल्याप्रमाणे मोठ्या संख्येने देशांवर समान दराने कर लादले तर जागतिक व्यापारातील घसरणीमुळे जगभरात मंदी येऊ शकते. ट्रम्प यांनीही ते नाकारलेले नाही. एक काळ असा होता की अमेरिकन राष्ट्राध्यक्षांना मंदीची भीती वाटत असे, पण ट्रम्प यांना वाटते की, ते मंदीपासून सुरक्षित आहेत. व्यवसायांना ते कोणती स्पष्टता देऊ शकतात, असे विचारले असता ते म्हणाले कालांतराने टेरिफ वाढू शकते. कॅनडा व मेक्सिकोवरील टेरिफ दीर्घकाळ चालू राहिले तर या अर्थव्यवस्था नष्ट होतील. दोन्ही देश अमेरिकेवर खूप अवलंबून आहेत. अमेरिका कॅनडाच्या ७५% व मेक्सिकोच्या ७७% निर्यातीचा खरेदीदार आहे. मेक्सिकन जीडीपीत निर्यातीचा वाटा ३६% आहे आणि कॅनडात ३३% आहे. त्यामुळे ट्रम्पच्या आयात शुल्कामुळे अमेरिकेच्या दोन शेजारी देशांच्या जीडीपीच्या किमान एकचतुर्थांश भागावर परिणाम होईल आणि त्यांना मोठ्या मंदीमध्ये ढकलले जाईल. मेक्सिकन अर्थव्यवस्था मंदीत गेली तर मेक्सिकोमधून येणारे स्थलांतर आताइतके कमी राहणार नाही. व्यापारयुद्ध थांबवण्यासाठी ट्रम्प या देशांकडून त्या बदल्यात काय इच्छितात हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. मेक्सिकोवर टेरिफ लादण्यामागील तर्क बेकायदेशीर स्थलांतर व फेंटॅनिल औषधाची निर्यात थांबवणे हा होता. बेकायदेशीर स्थलांतरितांचे आगमन जवळजवळ थांबले आहे. मेक्सिकोने २९ ड्रग्ज टोळ्यांतील नेत्यांना अमेरिकेकडे प्रत्यार्पण केले आहे. मेक्सिकन राष्ट्राध्यक्ष क्लॉडिया शेनबॉम यांनी दक्षिण सीमेवर १०,००० अतिरिक्त सैन्य तैनात केले आहे. पण, या सगळ्यानंतर मेक्सिकोला काय मिळाले? निर्यातीवर २५% टेरिफ !

कॅनडावर टेरिफ लादण्याचे कारण आणखी अस्पष्ट आहे. उत्तरेकडील सीमेवरून स्थलांतरितांचा प्रवाहही कमी आहे, तसेच फॅटॅनिल ड्रग्जची तस्करीही कमी आहे. पण, कॅनडा आता आपली अर्थव्यवस्था मोठ्या मंदीत जाण्यापासून रोखण्यासाठी काय करेल? आणि टेरिफचा प्रकोप टाळण्यासाठी चीनने काय करावे ? लक्षात ठेवा, मेक्सिको, कॅनडा व चीनवरील कर परस्परविरोधी नाहीत. ट्रम्प दावा करत आहेत की, उच्च दर लादून ते उत्पादकांना अमेरिकेत येण्यास भाग पाडतील. त्यांनी त्यांच्या स्टेट ऑफ द यूनियन भाषणात असेही म्हटले होते की, त्यांनी अमेरिकेत उत्पादन केले तर त्यांना शुल्क भरावे लागणार नाही म्हणून ते येतील. ट्रम्पसाठी टेरिफ धोरण म्हणजे अमेरिकेला पुन्हा महान बनवणे, परंतु, अमेरिकन लोक ट्रम्पच्या दुटप्पी मानकांना आत्मसात करत असताना जागतिक अर्थव्यवस्था मंदीच्या गर्तेत जाईल, अशी भीती वाढत आहे.

# ने.हि. महाविद्यालयाच्या मुलींच्या संघाला राष्ट्रीय हॅण्डबॉल स्पर्धेत कांस्यपदक



ब्रम्हपुरी/का.प्र.

लखनऊ, उत्तरप्रदेश येथे ४७ वी जुनिअर मुलींची राष्ट्रीय पातळी हॅन्डबॉल अजिंक्यपद स्पर्धा पार पडली. या स्पर्धेमध्ये महाराष्ट्र राज्याच्या मुलींच्या संघाने उत्कृष्ट कामगिरी पार पाडत कांस्य पदक प्राप्त केले.

महाराष्ट्र संघात ने. हि. महाविद्यालय, ब्रम्हपुरी येथील पायल ठाकरे, दिव्या घोरमोडे, वंशिका दुनेदार यांनी उत्कृष्ट असे प्रदर्शन करून गुजरात, पंजाब, आंध्रप्रदेश, राजस्थान, पश्चिम बंगाल व हरियाणा अश्या बलाढ्य संघाला हरवून महाराष्ट्र संघाला कास्यपदक मिळवून दिले

या सर्व खेळाडूंना नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेचे सचिव अशोकजी भैया, प्रा. जी.एन. केला, मेजर विनोद नरड संचालक कनिष्ठ महाविद्यालय, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी.एच. गहाणे, डॉ. एस. एम. शेकोकर उपप्राचार्य तथा शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख, डॉ. एम. ए. शेख क्रीडा समिती अध्यक्ष, डॉ. के. एम. शर्मा, प्रा. आनंद भोयर पर्यवेक्षक कनिष्ठ महाविद्यालय, संजू मेश्राम यांचेसह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, क्रीडा समिती मधील सर्व सदस्य, शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद यांनी शुभेच्छा दिल्या. सत्कार कार्यक्रमामध्ये सर्व विजेत्या खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. सोबतच मुख्य प्रशिक्षक सुरज मेश्राम, शुभम जंगले, सौरभ तलमले, ऋतुज मेश्राम यांचाही सत्कार करण्यात आला.

# 'जय श्रीराम'च्या घोषाने नागभीड नगरी दुमदुमली

## आम. बंटी भांगडिया, मेघा भांगडिया, अपर्णा भांगडिया यांची शोभयात्रेला भेट

नागभीड/प्रतिनिधी

श्रीराम नवमी उत्सव समिती नागभीड च्या वतीने चिमूर विधानसभा क्षेत्राचे आमदार बंटी भांगडिया यांच्या मार्गदर्शनात रामनवमीला भव्य अशी शोभा यात्रा नागभीड शहरातून काढण्यात आली.



मान्यवरांच्या हस्ते प्रभू श्रीराम यांच्या प्रतिमेचे रीतसर पूजन करण्यात आले. त्यानंतर शोभा यात्रेला सुरुवात करण्यात आली. सर्वात समोर ढोल ताशा पथक, प्रभू श्रीरामाची भव्य असे सुशोभीत छायाचित्र, घोड्यावर स्वार पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर, छत्रपती शिवाजी महाराज सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. प्रभू श्रीराम, लक्ष्मण, माता सीता यांची रथावर आकर्षक झाकी, नवदुर्गा झाकी, प्रभू श्रीराम यांच्या जन्मावर आधारित झाकी व इतर झाक्या, आकर्षक लायटिंग, फटाक्यांची आतिषबाजी यामुळे शोभा यात्रेला भव्यता आली.

या शोभा यात्रेत हिंदू मुस्लिम एकतेचे दर्शन घडून आले. नागभीड मुस्लिम समाज व एकता मुस्लिम युवा ग्रुप च्या वतीने शोभा यात्रेत सहभागी राम भक्तांना शरबत चे वितरण करण्यात आले तर विविध ठिकाणी मुस्लिम बांधवाकडून फुलांची उधळण श्रीराम, लक्ष्मण माता सीता यांच्या रथावर करण्यात आली. स्वामी विवेकानंद पतसंस्थेच्या वतीने रामभक्तांना लाडू, काबरा परिवाराच्या वतीने थंड पेय, स्वा.सावरकर चौकात सुधाकर बोरकर व मित्र परिवारच्या वतीने दूध वितरण करण्यात आले. शोभा यात्रेला नागभीड व नगर परिषद क्षेत्रातील जनतेने उत्तम प्रतिसाद दिला. सदर शोभायात्रेत महिलांची लक्षनीय उपस्थिती होती. सर्व महिला जय जय श्रीराम च्या घोषणा देत होत्या. बाल, युवा, प्रौढ सर्व एक हृदयाने या शोभायात्रेत सहभागी झाले होते. सदर शोभा यात्रेच्या प्रसंगी श्री रामनवमी उत्सव समितीचे मार्गदर्शक तथा आमदार बंटीभाऊ भांगडिया यांनी भेट दिली व प्रभू श्रीराम यांच्या प्रतिमेचे दर्शन घेतले. सोबतच मेघा भांगडिया, अपर्णाताई भांगडिया यांनी सुद्धा भेट देत महिलामध्ये सहभागी झाल्या.

## विनोदिनी

पप्पू के घर के दरवाज़े के ताले की चाबी खो गई... बहुत धुंधनें पर भी नहीं मिली... तो उसने दरवाजाही निकाला और कंधे पे रख के बाज़ार मे ठीक करने गया...

एक आदमी ने पूछा : ओ भाई, क्या दरवाज़ा बेचना है ???

पप्पू : नही, ताला खुलवाना है, चाबी गुम हो गई है...

जोक अभी आगे है :

हँसो मत !!!

आदमी पप्पू से : अगर घर मे चोर घुस गये तो ???

पप्पू : अंदर कैसे जाएगा ??? दरवाज़ा तो मेरे पास है..!! और चाबी भी नहीं है...!!!

# ने.हि. कन्या विद्यालयाच्या तब्बल नऊ विद्यार्थीनी एनएमएमएस स्कॉलरशीपसाठी पात्र

## पात्र विद्यार्थीनींना तब्बल चार वर्ष मिळणार वार्षिक १२ हजार शिष्यवृत्ती




ब्रम्हपुरी/का.प्र.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी घेण्यात येणाऱ्या एन.एम.एम.एस. स्कॉलरशिप परीक्षेचा सत्र २०२४-२५ चा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला. यामध्ये नेवजाबाई हितकारणी कन्या विद्यालय, ब्रह्मपुरी येथील ९ विद्यार्थिनींची स्कॉलरशिप करिता निवड झाली. आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील आठवीमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमधून प्रज्ञावान विद्यार्थ्यांचा शोध घेणे तसेच बारावीपर्यंत शिक्षण पूर्ण करता यावे, यासाठी मानव संसाधन विकास मंत्रालय नवी दिल्ली मार्फत ही शिष्यवृत्ती योजना राबवली जाते. सदर उत्तीर्ण विद्यार्थिनींची सुमारे १२००० रुपये वार्षिक स्कॉलरशिप करिता निवड झालेली आहे. ही स्कॉलरशिप त्यांना चार वर्षे मिळणार आहे.

नेवजाबाई भैय्या हितकारिणी शिक्षण संस्थेचे सचिव अशोकजी भैया यांच्या नेतृत्व व मार्गदर्शनाखाली विद्यालय यशाची नवनवीन शिखरे सर करत असून विद्यालयाच्या या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे. ब्रह्मपुरी तालुक्यामधून स्कॉलरशिप करिता सर्वाधिक विद्यार्थिनी ने.हि. कन्या विद्यालयाच्या पात्र झालेल्या आहेत. सदर उत्तीर्ण विद्यार्थिनींमध्ये कु. राजश्री संजय आंबोरकर, कु. पल्लवी दीनानाथ बुल्ले, कु. मैत्री गव्हर्नर रामटेके, कु. कांचन टिळक कांबळे, कु. निधी प्रशांत बावणे, कु. ज्ञानेश्वरी हिरालाल नाकतोडे, कु. रोहिणी ईश्वर बोरघरे, कु. प्रिन्सि भास्कर बोदेले , कु. सृष्टी प्रमोद सहारे या विद्यार्थिनींची स्कॉलरशिप करिता निवड झालेली आहे. ही स्कॉलरशिप त्यांना वार्षिक १२ हजार रूपये चार वर्षे मिळणार आहे.

ने.हि. कन्या विद्यालयात वर्षभर एन.एम.एम.एस. स्कॉलरशिप परीक्षेचे वर्ग नियमितपणे घेऊन त्यांना मार्गदर्शन देण्यात येते. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती स्नेहलताताई भैय्या, संस्थेचे सचिव अशोकजी भैय्या तथा शाळेच्या मुख्याध्यापिका प्रभा बनपूरकर मॅडम, उपमुख्याध्यापक विजय निखारे , पर्यवेक्षिका अर्चना खंडाते मॅडम, पालक प्रतिनिधी हिरालालजी नाकतोडे तथा सर्व शिक्षक, शिक्षिका कडून विद्यार्थिनींचे अभिनंदन करण्यात आले असून, त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी संस्थेच्या वतीने संस्थेचे सचिव अशोकजी भैया यांच्या हस्ते विद्यार्थिनींना भेटवस्तू देता भावी काळात अथक मेहनत घेऊन स्पर्धा परीक्षामध्ये विद्यार्थिनींनी यश प्राप्त करावे असे मार्गदर्शन केले .

कार्यक्रमाचे संचालन खोब्रागडे सर यांनी तर आभार प्रदर्शन गहाणे सर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संपूर्ण शिक्षकवृंद व विद्यार्थिनींनी सहकार्य केले.

# किन्ही येथे श्रीराम जन्मोत्सव व भागवत सप्ताह

ब्रम्हपुरी / का.प्र.

तालुक्यातील किन्ही येथील श्रीराम मंदिर देवस्थान येथे श्रीराम नवमी निमित्त रविवार, दिनांक ०६ एप्रिल २०२५ रोजी श्रीराम जन्मोत्सव व सत्कार समारंभ मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरा करण्यात आला. या धार्मिक आणि सामाजिक कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणून माजी जिल्हा परिषद सदस्य प्रमोद चिमूरकर उपस्थित होते.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून अन्नाजी ठाकरे बाबुसाहेब रुई, सुरेशजी दर्वे किन्ही, ताराचंदजी पारधी उपसरपंच खरकडा, योगेश ढोरे, प्रमोदजी मोटघरे ब्रह्मपुरी, पुंडलीकजी प्रधान किन्ही उपस्थित होते.

या कार्यक्रमाआधी श्रीराम नवमीच्या पार्श्वभूमीवर दिनांक ३० मार्च २०२५ पासून श्रीराम ज्ञानदान भागवत सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. सुप्रसिद्ध भागवतकार ह.भ.प. शामसुंदर महाराज (इंजोरी, ता. अर्जुनी, जि. गोंदिया) यांच्या मधुर वाणीतील प्रवचनांनी ग्रामस्थांचे मनोबल उंचावले. सप्ताहात विविध धार्मिक कार्यक्रम, भजन-कीर्तन व सामूहिक सहभागाचे आयोजन करण्यात आले होते. या संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन श्रीराम मंदिर देवस्थानच्या वतीने करण्यात आले होते.

# डी.फॉर्म. विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

ब्रम्हपुरी/का.प्र.

बेटाला येथील महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी येथे दि.४ एप्रिल २०२५ ला डी.फॉर्म लांडगे, प्रा. अमिषा जयस्वाल, प्रा.राकेश तरारे, प्रा. पल्लवी डफ, प्रा. रेश्मा मातेरे तसेच शिक्षकेतर कर्मचारी आणि बहुसंख्येने



फायनल च्या विद्यार्थांकरीता प्रथम वर्ष डी.फॉर्म च्या विद्यार्थांतर्फे निरोप समारंभ आयोजित करण्यात आला.

या प्रसंगी डॉ. तौकीर शेख, गेडाम सर, प्राचार्य डॉ. सचिन दुधे, रा.से.यो.अधिकारी प्रा. श्रीकांत महाजन, प्रा. विजया सोनवणे, प्रा.डॉ. सुहास साकरकर, प्रा.डॉ. अनुप बारसागडे, प्रा.पृथ्वीराज मेश्राम, प्रा. छगन डोईजड, प्रा. निनाद बुरखंडे, प्रा. चेतन चौधरी, प्रा. सविता वसाके, प्रा.पूजा घुटके, प्रा. प्रसेनजीत विद्यार्थी उपस्थित होते. या प्रसंगी मान्यवरांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना संबोधित केले. प्रसंगी डी.फॉर्म च्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालय, स्टाफ आणि असलेल्या सुविधाविषयी आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रथम वर्ष डी.फॉर्म प्राजक्ता खोब्रागडे, अनुपमा डोरीवार आणि पराग बोरकर यांनी तर आभार प्रदर्शन प्रथम वर्ष डी.फॉर्मचा विद्यार्थी पुष्पक बावने याने केले.

# निरंतर संघर्ष करणाराच स्वप्नांची पूर्तता करतो

## - एपीआय शितल खोब्रागडे



ब्रम्हपुरी/का.प्र.

"आपल्या देशाला लढवय्या शूर स्त्री विरांगणाचा इतिहास आहे. आलेल्या संकटावर मात करून परिस्थितीशी दोन हात केले आणि अखंड भारताच्या सामाजिक परिवर्तनाच्या लढ्यात अनेक समाजसुधारक जन्मास आले. तो संघर्षाचा इतिहास विसरता कामा नये. मी ग्रामीण भागातील आहे, मी गरीब आहे, माझी परिस्थिती नाही मला सुख सुविधा नाही असे रडगाणे न सांगता, जी विद्यार्थिनी आपले स्वप्न पूर्ण करण्यासाठी आपल्या परिस्थितीला बदलविण्यासाठी सतत संघर्ष करते. जिद्दीने पेटून उठून आत्मविश्वासाने कठोर मेहनतीने आलेल्या प्रत्येक खाच खळग्यांना पार करते ती कधीच हार मानीत नाही तर यशाला गवसणी घाऊन इतरांना आदर्शवत ठरते," असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयातील एन सी सी गर्ल्स यूनिट प्रथम आणि द्वितीय वर्षाच्या विद्यार्थिनी तर्फे आयोजित निरोप समारंभ कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक स्थानावरून शितल खोब्रागडे यांनी केले. एकदा अपयश आले म्हणून खचून न जाता सतत प्रयत्न करीत रहा.स्व अनुभव आणि जीवनाची वास्तविकता कथन करून मी करू शकते तुम्ही का नाही यातून प्रेरणादाई विचार मांडले.

स्थानिक डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयातील एन सी सी गर्ल्स युनिटच्या वतीने आयोजित निरोप समारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. देवेश कांबळे होते. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून संस्थेच्या सदस्या रीमा कांबळे, प्रा.डॉ. सिंधा कांबळे, कोमल घाडगे पी एस आय पोलीस स्टेशन ब्रम्हपुरी तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून शीतल खोब्रागडे ए पी आय. पोलीस स्टेशन ब्रम्हपुरी व प्रशांत डांगे पत्रकार ब्रम्हपुरी हे होते. यावेळेस उत्तम कार्य करणाऱ्या एनसीसी कॅडेटचे मेडल देऊन सन्मानित करण्यात आले. प्रास्ताविक लेप्ट. प्रा. सरोज शिंगाडे यांनी केले तर सूत्रसंचालन एन सी सी कॅडेट सपना पंचभाई हिने केले. मान्यवरांचे आभार त्रिवेणी ठाकरे हिने मानले.

# शिक्षणनगरी की गुन्हेगारांचे अड्डे? ब्रम्हपुरीत विद्यार्थ्यांची सुरक्षा धोक्यात

## दोन विद्यार्थ्यांना चाकूचा धाक दाखवून लूटले

ब्रम्हपुरी/का.प्र.

दि. २१ मार्च रोजी ब्रम्हपुरी शहरातील बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयासमोर एक अत्यंत धक्कादायक आणि मन हेलावून टाकणारी घटना घडली. शाळा सुटल्यानंतर घरी जात असलेल्या सातवीतील आणि नववीतील दोन अल्पवयीन विद्यार्थ्यांना रस्त्यात अडवून, चाकूचा धाक दाखवत तीन युवकांनी त्यांच्याकडून खिशातील पैसे हिसकावून घेतले. विद्यार्थ्यांशी घडलेला हा प्रकार केवळ गंभीरच नव्हे तर शहरातील असुरक्षिततेचे भीषण चित्र अधोरेखित करणारा आहे.

नशेच्या विळख्यात अडकलेल्या या युवकांनी विद्यार्थ्यांना चाकूचा धाक दाखविला आणि पैसे हिसकावून घेतले. नागरिकांच्या सतर्कतेमुळे या तिघांना पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले, हे सुदैव असले तरी ब्रम्हपुरीत दिवसेंदिवस गांजेटी, नशेबाज आणि गुन्हेगारांचा सुळसुळाट मोठ्या प्रमाणात वाढत आहे, हे या घटनेतून पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. सांस्कृतिक वारसा लाभलेल्या ब्रम्हपुरीसारख्या शिक्षण, आरोग्य आणि क्रीडानगरीच्या प्रतिमेला हा डाग असून अशा घटनांमुळे पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. 'माझा मुलगा शाळेतून घरी सुरक्षित पोहोचेल का?' हा प्रश्न पालकांच्या मनात अस्वस्थपणे घर करून बसणारा आहे.

येथील हुतात्मा स्मारक परिसर, जिल्हा परिषद शाळा क्र. ४ परिसर, तसेच शहरातील अनेक भाग हे गांजेटींचे अड्डे झाले आहेत. रात्रंदिवस अनेक युवक खुलेआम गांजा ओढताना दिसतात. गांज्याच्या नशेत ते कोणतेही कृत्य करण्यास सक्षम असतात. चाकू दाखवून विद्यार्थ्यांकडून पैसे हिसकावण्याची ही घटना त्याचाच भयानक पुरावा आहे. अवैध धंद्यांच्या विळख्यात अडकलेल्या ब्रम्हपुरीत दारू विक्री, सट्टा-पट्टी, जुगार, गांजासारखे पदार्थ विक्रीचा व्यवसाय मोठ्या प्रमाणात चालतो. अनेक वेळा पोलिसांनी केलेल्या कारवाईत जप्त रकमेचा आकडा अत्यल्प असतो. यामुळे संबंधितांवर संशय घेण्यास वाव मिळतो. अशा अवैध धंद्यांवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी प्रशासनाची असून, त्यात अपयश आल्यास हा प्रश्न अधिक गंभीर बनतो.

शहरात रस्त्यापासून गल्लीबोळांपर्यंत सुरू असलेल्या वाळू, मुरूम तस्करीमुळे या नागरी व्यवस्थेचे विद्रुपीकरण होत आहे. शिक्षण आणि संस्कृतीच्या नावाने ओळखली जाणारी ब्रम्हपुरी आता गुन्हेगारी, अवैध व्यवसाय, नशा आणि असुरक्षिततेचे केंद्र बनू लागले आहे. या पार्श्वभूमीवर, प्रशासनाने गांजेटी, नशेबाज आणि गुन्हेगारांवर कठोर कारवाई करणे हे फक्त त्यांच्या कर्तव्यातील भाग नसून, समाजासमोर असलेली जबाबदारी असून पोलिस प्रशासन आणि स्थानिक यंत्रणांनी गांजाबंदी, अवैध धंद्यांचा बीमोड करण्यासाठी तातडीने कठोर कारवाई करणे अत्यावश्यक आहे.

शहरातील सर्व रस्ते आणि महत्त्वाच्या भागांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा प्रभावीपणे बसवली जावी आणि त्याद्वारे होणाऱ्या घटना वेळीच हेरून गुन्हेगारांवर त्वरित कारवाई केली जावी. शहराची सुवर्ण प्रतिमा टिकवून ठेवण्यासाठी आता कठोर पावले उचलण्याची वेळ आली आहे. प्रशासन, पोलीस यंत्रणा आणि समाजाने मिळून या धोक्याविरुद्ध आवाज उठवणे अत्यावश्यक झाले आहे. अन्यथा ब्रम्हपुरीची ओळख अंधारात हरपण्यास वेळ लागणार नाही.

# भाषेचे संशोधन हे समाजोपयोगी असले पाहिजे

## संशोधकांचा सूर : मराठी संशोधन केंद्राचा उपक्रम



ब्रह्मपुरी/का.प्र.

आपली मातृभाषा आता अभिजात झाली आहे. ही मायबोली खरी टिकविली असेल तर ग्रामीण भागाने. जात्यावरच्या ओव्या, लगीनगीते, महादेवाची गाणी, पोळयातील झडत्या, दंडारगीते, बावला-बावलीची लगीनगीते, भुलाबाईची गाणी, आदिवासी कथा, भिल्लांची गाणी अशा बहुमोल लोकसाहित्याने मराठीला समृद्ध केले व टिकविले. हे लोकसंचित लोकांचा हृदयहुंकार होता. आद्यकवी मुकुंदराज, चक्रधरांचा महानुभाव पंथ, ज्ञानोबा - तुकोबाचा वारकरी संप्रदाय, पुढं लावणी, पोवाडयांचा शाहिरी प्रवास यातून समाजमनाची, वस्तुस्थितीची स्पंदने आली. या मौखिक साहित्याचे संकलन व संशोधन झाले पाहिजे. लोकांचे जनजीवन सुलभ होणे, प्रबोधन - मनोरंजन होणे ही साहित्याची भूमिका असली पाहिजे आणि भाषेचे संशोधन हे समाजोपयोगी असले पाहिजे असा सूर मराठी संशोधकांनी काढला.

निमित्त होते नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयातील मराठी विभाग व संशोधन केंद्र आयोजित संशोधनकार्य करणाऱ्या संशोधक विद्यार्थी मुलाखतीचा. हा कार्यक्रम विभागप्रमुख डॉ. धनराज खानोरकरांनी प्राचार्य डॉ. डी.एच. गहाणे व उपप्राचार्य डॉ. सुभाष शेकोकरांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केला. यावेळी डॉ. जगदिश मेश्राम, डॉ. पद्माकर वानखडे आणि संशोधक उमा चंदेल, माधव चुटे, कु.मेश्राम इत्यादींनी मराठी संधोधनावर दीर्घ चर्चा केली.

प्रास्ताविक डॉ. खानोरकरांनी, संचालन व आभार प्रदर्शन डॉ. वानखडे यांनी केले. कार्यक्रमाला पदवी व पदव्युत्तर विभागातील विद्यार्थी उपस्थित होते.

# आवळगावची जुई एनएमएमएस परीक्षा प्राविण्यासह उत्तीर्ण



ब्रम्हपुरी/का.प्र.

राष्ट्रीय आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी (NMMS) नुकत्याच घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत महाराष्ट्र विद्यालय, आवळगांव ची विद्यार्थिनी कु. जुई सुरेश झरकर ही ८६% गुण प्राप्त करून उत्तीर्ण झाली आणि सामान्य गटातून शिष्यवृत्ती परीक्षेसाठी पात्र ठरली.

तिने संपादित केलेल्या यशामुळे विद्यालयाचे मुख्याध्यापक एस.एल. दिघोरे यांचेसह विद्यालयातील सर्व शिक्षक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी तिचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

# पिंपळगांव भो. येथे श्रीराम जन्मोत्सव

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी तालुक्यातील वैनगंगा नदीकाठी वसलेले भाजीपाला, धान पिकासाठी प्रसिध्द, सात हजार लोकसंख्येचे पिंपळगाव भोसले येथे सनातन काळापासुन आज ही सर्वजाती धर्माचे पक्ष भेद बाजुला ठेवुन गुण्यागोविंदाने लोक राहतात. गावात आजही श्रीराम जन्मोत्सवाची परंपरा जपली जात असुन गुडीपाडवा सणापासुन येथील हनुमान मंदीर पेठवार्ड, आडकुजी बाबा व पाजीबाबा या तिन्ही मंदीरात आठ दिवस सायंकाळी हरीपाठ तर सकाळी समस्त गावात रामधुन काढली जाते.

तेव्हापासून नवव्या दिवशी पांजीबाबा, आडकुजी बाबा, हनुमान मंदीर पेठवार्ड श्रीराम जन्म उत्सव मोठ्या थाटामाटात ढोल ताशाच्या गजरात रामाचा जन्म उत्सव करुन सकाळ पासुन भक्त गण यात्रेकरुसाठी महाप्रसाद, सायंकाळी विवाहसोहळा, रात्रोला किर्तन, सात खंजरी महाराजाचे भजन आणि रात्री भोजन व्यवस्था करुन श्रीरामाची पालखी काढल्या जाते.



यासाठी तालुक्यातील नव्हे विदर्भातील भक्त गण हजारोच्या संख्येने उपस्थीत राहून रामनवमी, श्रीराम जन्मोत्सव शांततेत पार पडते.

या कार्यक्रमाला माजी नगरसेवक गौरव भैय्या, पोलीस निरिक्षक प्रमोद बानबले, सरपंच सुरेश दूनेदार पिंपळगाव, माजी सरपंच सुनिल धांडे, पत्रकार गोवर्धन दोनाडकर ब्रम्हपुरी, माजी सरपंच मनोज ढवळे अर्हेर नवरगाव, अनंता उरकुडे, डॉ.पारेश सेलोकर, माजी न्यायाधीश चंद्रलाल मेश्राम, अण्णाभाऊ ठाकरे, मुख्याध्यापक ओमप्रकाश बगमारे, गडे साहेब, दोनाडकर काकाजी, केशव भुते, गुड्डु बागमारे, मधुकर मेश्राम पत्रकार आदींसह गावकरी व भक्तगण उपस्थित होते.

# ब्रम्हपुरीत चैत्राच्या घोड्यांची ४०० वर्षांची परंपरा आजही कायम





ब्रम्हपुरी/का.प्र.

शहरातील रेणुका माता मंदिर व भवानी माता मंदिरातून चैत्राच्या दिवशी लाकडी सजविलेल्या घोड्यांची मिरवणूक काढण्यात येते. ही परंपरा तब्बल चारशे वर्षाहून अधिक कालावधीपासून आजतागायत कायम आहे. दोन्ही मंदिरासमोर ढोभरीत ( मातीची हांडी ) आग पेटवून हातात घेऊन नृत्य केला जातो. बाजार चौकात मिरवणूक गेल्यानंतर तेथील माता मंदिरासमोर देखील ढोबरी नृत्य केला जातो.

ब्रम्हपुरी शहर विद्येचे माहेरघर, क्रीडा नगरी, वैद्यकीय नगरी म्हणून ओळखले जाते. त्याबरोबरच सांस्कृतिक शहर म्हणूनही ओळखले जाते. इतिहासाची साक्ष देणारे दगडी खांब तसेच गोंडकालीन वास्तूच्या खुणा आजही या भागात सापडतात. याच संस्कृतीची साक्ष चैत्रानिमित्त पहावयास मिळते. सदर परंपरा चारशे वर्षाहून अधिक काळापासून सुरु असल्याचे सांगितले जाते. चैत्राच्या दिवशी दिवसभर दोन्ही मंदिरात भाविक मोठ्या संख्येने दर्शनासाठी गर्दी करतात. सायंकाळी लाकडी घोडे, दोन्ही बाजूला दोन रक्षक सजवून मिरवणूक काढण्यात येते. मंदिरासमोर डफरीच्या तालावर ढोभरी नृत्य केला जातो. सदर ढोभरी नृत्य मिरवणुकीत असते. फटाक्यांची आतिषबाजी करत ही मिरवणूक शहरातील मुख्य मार्गाने बाजार चौकात पोहचते. या निमित्ताने आकाशपाळणे, विविध साहित्य विक्रीसाठी आणले जातात. यावेळी ही मिरवणूक बघण्याकरीता मोठी गर्दी उसळते. माता मंदिरासमोरील ढोभरी नृत्य पाहण्याकरिता प्रेक्षकांची एकच गर्दी होते. या यात्रेमुळे शहरात सांस्कृतिक वातावरण निर्मिती होते.

### तुकडोजी महाराजांनी दिली मंदिराला भेट

**सदर मंदिर निर्मिती नंतर तुकडोजी महाराज येथे आले होते. त्याचे फोटो आजही आहेत. बाजूच्य जुन्या कृष्णा टॉकिजच्या जागेवर तुकडोजी महाराज यांच्या भजनाचा कार्यक्रम देखील आयोजित केला होता.**

**रेणुका माता मंदिराची जागा तालुक्यातील गोगाव येथील सदाशिव कुंभार यांची होती. येथे माठ बनविण्याचा ते व्यवसाय करायचे. त्यांनी मातीची देवीची मूर्ती बनवून येथे स्थापन केल्याचे आमच्या पूर्वजांनी सांगितले होते. त्यावेळी येथे झोपडी होती. रंगारी समजाच्या पूर्वजांनी या मंदिराची देखरेख केली. तर गंगाराम कुर्वे यांनी लाकडी घोडे व दोन पहारेकरी तयार करून ही मिरवणूक सुरु केल्याचेही आमच्या पूर्वजांनी सांगितले होते.**

**- नारायण बोकडे, माजी सरपंच ब्रम्हपुरी ग्रामपंचायत**

# विविध प्रमाणपत्र व आरोग्य तपासणी शिबीर संपन्न

## एसडीओ पर्वणी पाटील व तहसीलदार सतीश मासाळ यांची उपस्थिती



ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी तालुका मुख्यालयापासुन २५ किलोमिटर अंतरावर असलेल्या व भटक्या जमातींचे १५ कुटुंबाचे वास्तव्य असलेल्या गणेशपुर पातली या गावात संबंधितांना जात प्रमाणपत्र / जन्म प्रमाणपत्र व इतर प्रमाणपत्र वितरित करण्याकरीता मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे १०० दिवसांचे कार्यक्राअंतर्गत तहसील कार्यालय ब्रम्हपुरीचे वतीने विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिरास उपविभागीय अधिकारी पर्वणी पाटील , तहसीलदार सतीश मासाळ यांनी मार्गदर्शन केले. तसेच विविध प्रमाणपत्रांचे वितरण केले.

या शिबिरात जात प्रमाणपत्र , जन्म प्रमाणपत्र वितरित करण्याकरीता अर्ज भरून घेण्यात आले. तसेच उत्पन्न प्रमाणपत्र, रेशनकार्ड चे वितरण, आधार अपडेट व आधार संबंधीत कामे, जन धन बँक खाते तयार करणे, संजय गांधी योजना तसेच आरोग्य तपासणी शिबिरात २०९ नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. शिबिरास नायब तहसीलदार आशिष तालेवार, महानंदा मडावी , लीना बोबाटे , ग्रामीण रुग्णालय ब्रम्हपुरी चे डॉ. श्रीकांत कामडी व वैद्यकिय चमू, भारतीय स्टेट बँक ब्रम्हपुरी विजय कुमार शर्मा व टीम, प्राथमिक आरोग्य केंद्र मेंडकी यांची टीम, सरपंच, पोलीस पाटील, ग्राम महसूल अधिकारी घनश्याम राऊत, ग्रामसेवक मने, पुरवठा विभागाचे दिलीप मेश्राम, ऑपरेटर, महसूल सेवक ठवकर गांगलवाडी , आधार केंद्र चालक कुथे, सीएससी केंद्र चालक कलमगाव यांचेसह गावातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संचालन व प्रास्ताविक आकाश भाकरे मंडळ अधिकारी गांगलवाडी यांनी केले.


**आता लवकरच आमचा ई-पेपर येणार...**

**थोड्याच अवधीनंतर ब्रम्हपुरी समाचारचा E-Paper प्रकाशित करण्यात येईल. याची वाचकांनी नोंद घ्यावी.**

**आजच अर्धसाप्ताहिक ब्रम्हपुरी समाचारचे वार्षिक वर्गणीदार व्हा...**

: कार्यालय पत्ता : गाडगे बाबा स्मारकासमोर, विद्यानगर, ब्रम्हपुरी

: जाहिरातींसाठी संपर्क : महेश पिलारे मो. ९५०३१००९६४ प्रा. विजय मुडे सर मो. ८२७५७१५३१५


**... QUOTES ...**

"I suppose leadership at one time meant muscles; but today it means getting along with people."

- Mahatma Gandhi

**चारोळी**

*आम्ही देशाला लुटतो*
*तुम्ही परस्परांना लुटा...*
*आम्ही 'जेब भरो' करतो,*
*तुम्ही 'जेल भरो' करा...*

★ रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल ★

# हायवेवरील बाइक्स पार्किंगमुळे अपघातांची शक्यता



ब्रम्हपुरी/का.प्र.

आज-काल दुचाकी, चारचाकी वाहनांची संख्या खुप वाढली आहे. घरोघरी एक कार व दोन तीन बाईक असतात. त्या प्रमाणात रस्ते फार अरूंद झाले आहेत . त्यामुळे लोक घराच्या बाहेर निघाले की त्यांनी पार्किंगची समस्या भेडसावते मग तो साधा गावातील रस्ता असो कि हायवे.

अशीच एक समस्या खिस्तानंद चौक ते बस स्टॅण्ड दरम्यान नंदू ट्रेडर्स व को. ऑपरेटिव्ह बँक या दरम्यान जी लहान दुकाने आहेत तिथे दुपारी थोडी कमी पण संध्याकाळी व रात्री तिथे त्या दुकानासमोर असंख्य बाइक्स ची ईतकी रॉंग पार्किंग असते कि जवळपास दहा ते पंधरा फूट अंतरापर्यंत तिथे डांबर रोड वर बाइक्स ची गर्दी असते. अशावेळी रस्त्याने जे इतर वाहने, बाईक वाले, सायकल वाले व पायी चालणाऱ्यांना त्याचा खूप त्रास होतो. अशावेळी केव्हा कुणाचा अपघात होईल हे सांगता येत नाही कारण तिथून जायला यायला जागाच नसते. यामुळे या ठिकाणी सिनियर सिटीझन, लहान मुले , स्त्रीयांना मार्गक्रमण करतांना जास्त धोका आहे.

तसे पाहिले तर तेथील दुकाने हायवे च्या बरेच आत आहेत पण तेथील ग्राहक आपल्या बाइक्स रस्त्यावर अस्ताव्यस्त लावतात. प्रशासन बरेचदा एखादी घटना घडल्यावर खाडकन जागे होत असते म्हणून एखादी अप्रिय घटना घडायच्या आत जर लक्ष दिले तर चांगल होईल. यांवर काहीतरी नियंत्रण आवश्यक आहे. सदर समस्येकडे पोलिस प्रशासनाने त्वरित लक्ष द्यावे, अशी मागणी समाजसेवक राजू भागवत सर यांनी केलेली आहे.

# हळदा येथे अवैध वाळूसाठा करणाऱ्यांवर कारवाई करा

## अनिरुध्द मंडल यांची पत्रकार परिषदेत मागणी



ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रह्मपुरी तालुक्यातील मौजा हळदा येथील नदीपात्रात वाळूसाठा असल्याचे शासनास दाखवून हजारो ब्रास अवैध वाळूसाठा करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्याची मागणी झालेल्या पत्रकार परिषदमध्ये अनिरुद्ध मंडल यांनी केली.

शासनाच्या धोरणानुसार हळदा येथील नदीपात्रातील वाळू उपसा करण्याची परवानगी सन २०२२ मध्ये देण्यात आली. सदर परवाना मे. केशवप्रिया इंन्फास्ट्रक्चर, पार्टनर कौशल कजारीया यांना देण्यात आले. सदर कंपनीला रेती साठा करण्यासाठी हळदा येथील गट क्र. ७२/१,७२/२,७२/३, परवानगी देण्यात आली. परंतु सदर कंपनीने वाळूसाठा नसताना सुद्धा ५१०० ब्रास वाळू असल्याचे शासनास दाखवून हजारो ब्रास अवैध वाळू उपसा केला जात आहे. हळदा येथील ज्या गट क्र. ७२/१,७२/२, ७२/३ देण्यात आले आणि ५१०० ब्रास अवैध वाळू दाखवण्यात आले. त्या गटात कुठलाही वाळू साठा नाही. मग शासनाने कुठल्या आधारावर वाळू उचल करण्यासाठी परवानगी दिली असाही प्रश्न निर्माण होत आहे. सदर वाळू साठा हा गट क्रं ७१/२ आराजी ०.७२ शेत मालक कवळू मेश्राम यांच्या विनापरवानगी आठ ते नऊ हजार ब्रास वाळू उचल करण्यात आले आहे. अशाप्रकारची तक्रारसुध्दा करण्यात आली आहे. तहसिलदार सतिश मासळ यांनी ३० जानेवारी २५ ला कारवाई आदेश काढत १,५६,८०० रुपयांचा थातूरमातुर दंडात्मक कारवाईचा दिखावा केला. जर शासनाने परवानगी दिलेल्या गट ७२/१,७२/२,७२/३ वाळूसाठाच नाही आणि ज्या गट क्र. ७१ या गटात आठ ते नऊ हजार ब्रास अवैध वाळूसाठा उपलब्ध असतानाही तहसीलदार सतिश मासाळ यांनी नियमानुसार कारवाई न करता केवळ कारवाईचा दिखावा केला आहे.

एक ब्रास वाळूची दंडात्मक कारवाई दहा हजार रूपये व विना परवाना वाळू वाहतूक करणे सहाशे रुपये असे एकूण दहा हजार सहाशे रुपये एका ब्रास वाळू दंडात्मक कारवाई केली जाते. मग हळदा येथील नदीपात्रातील खोटा वाळू साठा दाखवून आठ ते नऊ हजार ब्रास अवैध वाळू साठा करण्याऱ्या वर किती रूपयांची कारवाई केली पाहिजे हे पण तहसीलदार सतिश मासाळ यांनी स्पष्ट करावे. ज्या गट क्रमांक मध्ये बोगस वाळु साठा दाखविण्यात आले. येथील सि. सि. टिव्ही तपासणी करण्यात यावी व नियमानुसार कारवाई करण्यात यावी, अशी मागणी पत्रकार परिषदेत अनिरुद्ध मंडल यांनी केली आहे.

## ब्रम्हपुरीत श्रीराम जन्मोत्सव...

(पान क्र. १ वरून)




श्रीरामभक्त बंधू, भगिनी श्रीराम जन्म शोभायात्रेत सहभागी झाले. मार्गात ठिकठिकाणी श्रीराम रथातील मूर्तींचे पूजन झाले तसेच स्वागत करण्यात आले. राजस्थानी समाजातर्फे मार्गात सावरकर चौकालगत महाप्रसाद वितरीत करण्यात आला. व्यापारी संघटनेद्वारे शोभायात्रेत सहभागी श्रीराम भक्तांना शितपेय वितरीत करण्यात आले.

डिजेवरील धार्मिक गीतांवर ताल धरणारे बजरंगी व युवा कार्यकर्ते तसेच चर्मकार समाजाची आकर्षक संत रविदास दर्शन, रा. स्व. संघाद्वारे 'देव देश व धर्मासाठी' दैनिक शाखेतून तयार होणारी संस्कारीत पिढी निर्माण, राष्ट्रसेविका समितीच्या वं. मावशी केळकर (समिती संस्थापिका)यांच्याव्दारे रामकथा देखावा यामुळे धार्मिकतेसोबतच राष्ट्र भावनेचा जागर शोभायात्रेतून झाला. शोभायात्रेचा संपूर्ण मार्ग तोरणे, भगवे ध्वज, फलक याव्दारे सजला होता. शोभायात्रा श्रीराम मंदिरात परतल्यावर आरती, महाप्रसादाने शोभायात्रेची सांगता झाली.




Miracle constructions & Developers
श्रीराम नगरी - डेव्हलपर्स
NATP प्लॉट्स उपलब्ध
सिंदेवाही
नवरगांव
तळोधी
चंद्रपूर (चौराळा)
संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501
डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.

सोरते स्टेनलेस स्टील वर्क्स
प्रो.प्रा. सुरेश सोरते
मो. 8698323337
(पान क्र. १ वरून)
गीत (तुरले) पेट्रोल पंपसमोर नागभीड रोड, ब्रम्हपुरी
रेलींग, ग्रिल व गेट स्टिलचे नावे बनवून मिळेल.






## अचानक आलेल्या वादळाने ट्रॅफिक लाईट व झाड कोसळले

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी शहरात उन्हाचा पारा चढत असतांना काल, बुधवारी सायंकाळी ५.३० वाजता दरम्यान अचानक वादळी वाऱ्याला सुरूवात झाली. अचानक आलेल्या वादळी वाऱ्यामुळे शहरातील मुख्य चौकात उभे असलेले झाड उन्मळून कोसळले. तर, शहरातील मुख्य चौकात ट्राफिक सिग्नल वरील लाईट खाली कोसळल्याची घटना घडली.

शहरात बुधवारच्या संध्याकाळी अचानक वादळी वाऱ्याला सुरूवात झाली. यात जवळपास अर्धा तास सुरू असलेल्या वादळाच्या तडाख्यात शहरातील झाँसी राणी चौक येथील रस्त्याच्या लगत असलेले करंजीचे झाड उखडून विजेच्या तारांवर कोसळले. यामुळे विजेच्या तारा तुटल्यामुळे विजेच्या तारांचे अतोनात नुकसान झाले, विद्युत प्रवाह खंडीत झाला होता. सुदैवाने कुठलीही जीवीत हानी झाली नाही. तर दुसऱ्या घटनेत शहरातील ख्रिस्तानंद चौकात वाहतूकीचे नियोजन करण्यासाठी लावण्यात आलेले ट्राफिक सिग्नलवरील लाईट खाली कोसळले. तर काही खांबावरील लाईट लोंबकळत असल्याचे घटनास्थळी दिसून येत आहे. पहिल्याच वादळात ट्राफिक सिग्नलचे लाईट कोसळणे हे ट्राफिक सिग्नल लावणाऱ्या कंत्राटदाराच्या बेजबाबदारपणाचे प्रत्यक्ष उदाहरण असल्याचे सुज्ञ नागरिकांचे म्हणणे आहे.






Lubi PUMPS-MOTORS
बुधवार बंद
- दुकानाची वेळ - सकाळी १० ते सायं. ६ वा.
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
Kirloskar
CRI
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता


Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404